प्रेस नोट दिनांक ११/८/२०१८

दिनांक ११/८/२०१८ रोजी पहाटे ०४.३० वाजताचे सुमारास कचरा डेपोचे पुढे मंतरवाडी फाटा कात्रज -सासवड रोडवर फिर्यादी ड्रायव्हर शंकर भिमराव कसबे वय २४ रा.कंपोस्ट वरवडे ता माढा जि सोलापुर हा ट्रक क्रमांक एम एच १२ क्यु जी २०४२ घेऊन जात असताना त्यास तीन अज्ञात इसमांनी त्यांची इरटीगा गाडी क्रमांक एम एच १२ एन ई ८८५१ ही आडवी लावुन खाली उतरुन ड्रायव्हरला (फिर्यादीस) जबरदस्तीने खाली उतरणेस सांगुन त्यास शिवीगाळ करुन हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन डोकयात लाकडी फळी सारख्या दांडक्याने मारहाण करुन त्यांचे खिश्यातील २०००/- रुपये तसेच वरील ट्रकच्या चाव्या व सॅमसंग कंपनीचा मोबाईल जबरीने काढुन त्यातील दोन इसमांनी ट्रक क्रमांक एम एच १२ क्यु जी २०४२ चालवीत घेऊन इतर एक संशयीताने हे त्यांचे वाहनासह सासवड दिशेच्या बाजुने निघुन गेले बाबतची खबर यातील ड्रायव्हर (फिर्यादी) शंकर भिमराव कसबे याने संशयीताचे इसमांचे वर्णनासह पोलीस स्टेशनला साधारण ०५.३० वा चे दरम्यान दिली होती त्यानंतर लागलीच रात्रगस्त वर असणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे ,सपोनि चव्हाण तसेच मपोउनि गावडे व पोलीस कर्मचारी यांनी सदर गाडीचा कसाशिने शोध घेऊन संशयावरुन व फिर्यादीने दिलेल्या वर्णनावरुन १.निखील सागर धुमाळ २.दिपक भरत हिरडेपाटील यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडुन गुन्हयात जबरी चोरी करुन घेतलेला ट्रक,रोख रक्कम रुपये २०००/-, हस्तगत केली नमुद आरोपी यांना तीन तासातच ताब्यात घेतले व तपास पथकातील कर्मचारी यांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे चौकशी केल्यानंतर त्यांनी दिलेल्या माहीतीचे आधारे आरोपी क्रमांक ३ .रविंद्रसिंग सरदार सिंग राजावत यास मोबाईल तसेच गुन्हयात वापरलेली इरटीगा कार क्रमांक एम एच १२ एन ई ८८५१ सह ताब्यात घेतले व जबरी चोरुन नेलेला ट्रक,रोख रक्कम,मोबाईल तसेच गुन्हयात वापरलेली इरटीका कार असा एकुण सुमारे ४०,००,०००/- **(चाळीस लाख रुपये)चा** माल हस्तगत केला आहे सदरची कारवाई ही अपर पोलीस आयुक्त उत्तर विभाग सुनिल फुलारी सो ,पोलीस उपआयुक्त परिमंडळ-४ श्री प्रसाद अक्कानुरु सो ,सहायक पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री मिलींद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे ,सपोनि चव्हाण ,मपोउनि सुप्रिया गावडे पोलीस कर्मचारी लोणकर,धेंडे ,गोसावी,चवरकर,चिवळे यांनी तीन तासातच नमुद आरोपी यांना जेरबंद केले आहे.सदर बाबत हडपसर पोलीस स्टेशन गु रजि क्रमांक ९०९/२०१८ भा.द.वि कलम ३९४,३४१,५०४ प्रमाणे दाखल आहे सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चव्हाण हे करीत आहेत.